दैनिक

# मुक्तागिरी

गुरुवार, दि. १६ सप्टेंबर २०२१ ..!

## समाज संपन्न करण्यात शिक्षकांचे योगदान मोलाचे - प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर

सातारा - शिक्षण क्षेत्रात सांघिकपणे कार्य करीत राहिल्यास अपेक्षित उद्दिष्ट्ये गाठता येतात.शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रात काळानुरूप झालेल्या बदलांकडे सकारात्मकतेने पहावे. सामाजिक परिवर्तनात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. शिक्षकांचे अध्ययन, अध्यापन व संशोधन क्षेत्रातील कार्य हे राष्ट्रीय कार्यच असते. शिक्षकांनी स्वतः चे जीवन संपन्न करीत असतानाच विद्यार्थ्यांचे ,कॉलेजचे व एकूणच समाजाचे जीवन सर्व अर्थाने संपन्न करण्याकडे अधिक लक्ष द्यावे. समाज संपन्न करण्यात शिक्षकांचे योगदान मोलाचे असते. असे विचार रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छत्रपती शिवाजी कॉलेज, साताराचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी व्यक्त केले.ते छत्रपती शिवाजी कॉलेज येथे प्राध्यापक सेवक कल्याण समिती व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षक दिन कार्यक्रमात बोलत होते.यावेळी उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार



वावरे, उपप्राचार्य डॉ.रामराजे माने - देशमुख, ज्युनिअर विभागाचे प्रमुख प्रा.गणेश पाटील, व्यावसायिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा.विजयसिंह घोरपडे व प्रशासन विभागाचे रजिस्ट्रार डॉ.अरुणकुमार सकटे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी गुरु परंपरेला वैभव प्राप्त करून दिले. एक विद्वान म्हणून राधाकृष्णन यांचे कार्य प्रेरक आहे.शिक्षकांनी नेहमी सतर्क व अभ्यासू रहावे. शिक्षकांनी भौतिक सुख सुविधेकडे साधन म्हणून पहावे अंतिम साध्य म्हणून नव्हे. आज शिक्षण क्षेत्रात परीक्षेतील टक्केवारीला महत्व आल्याने परीक्षार्थींचे समूह बनवले जात आहेत.त्यांमुळे विद्यार्थ्यांची मने घडविण्याचे, सुसंस्काराचे कार्य कुठेतरी कमी पडत आहे.

आज विज्ञान युगात विद्यार्थ्यांचे शिक्षकांवरील अवलंबत्व कमी पडत आहे. खरेतर वर्गखोलीतील अध्यापन पद्धत ही सर्व दृष्टीने परिणामकारक आहे. मात्र काळाचे आव्हान स्वीकारून ऑनलाईन शिक्षणात गुणवत्ता आणणे आवश्यक आहे. शिक्षकांनी तंत्रज्ञानाशी मैत्री केली तर विद्यार्थी व शिक्षक यामधील अंतर कमी होण्यास मदत होईल.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा